जो समय की कद्र करता है, वही जीवन में आगे बढ़ता है।

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शुक्रवार २१ फेब्रुवारी २०२५ | अंक ७४ पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

SUN Tourism INTERNATIONALL PVT. LTD. Since 2007
All TOURS घर से घर तक दिल से दिल तक
www.suntourismpune.in
सन टुरिझम
प्रस्तुत करते
देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय ग्रुप टूर्स !
आमच्या विशेष टूर पॅकेजेस
काश्मीर, वैष्णोदेवी, नैनीताल, शिमला, अयोध्या ग्रँड युरोप, ऑस्ट्रेलिया, जपान, दुबई, श्रीलंका व्हिएतनाम, सिंगापूर, थायलंड, बाली
आता आपल्या स्वप्नांच्या सहलींची नोंदणी करा...
-: अधिक माहितीसाठी संपर्क :-
99222 22272 / 7602727555

# धनंजय मुंडे बेल्स पाल्सी आजाराने त्रस्त, सलग दोन मिनिटे बोलताही येत नाही!

## बेल्स पाल्सी आजार नेमका काय?

बेल्स पाल्सी हा आजार झालेल्या व्यक्तीच्या चेहऱ्याचे स्नायू कमकुवत होतात. यामुळे चेहऱ्याच्या एका बाजूला अचानक अशक्तपणा येतो. काहीवेळा अर्धांगवायू देखील होऊ शकतो. यामुळे तुम्हाला एक डोळा बंद करण्यात अडचणी येऊ शकतात. तसेच हसण्यासही त्रास होऊ शकतो. हा आजार झालेल्या व्यक्ती पूर्णपणे ठीक होण्यासाठी साधारण काही आठवड्यांचा कालावधी लागतो.

## बेल्स पाल्सी ही एक मेंदूशी संबंधित म्हणजेच न्यूरोलॉजिकल समस्या आहे

मुंबई। प्रतिनिधी राज्याचे कॅबिनेटमंत्री धनंजय मुंडे गेल्या काही २ महिन्यांपासून वादाच्या भोवऱ्यात असून बीडमधील हत्याप्रकरणातील आरोपींशी जवळीक असल्याने त्यांच्या राजीनाम्याची मागणी होत आहे. त्यातच, सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी करत त्यांच्या कार्यकाळत कृषी विभागात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप कागदपत्रे दाखवून केल्याने राज्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. एकीकडे धनंजय मुंडेंवर आरोपांचा मालिका सुरू असतानाच त्यांच्यावर मोतीबिंदूची शस्त्रक्रिया पार पडली आहे. त्यामुळे, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आराम घेत आहेत. दरम्यान, डोळ्याच्या आजारातून बाहेर येत नाहीत, तोपर्यंत आता धनंजय मुंडेंना एका नव्या आजाराने ग्रासले आहे. धनंजय मुंडेंना बेल्स पाल्सी हा आजार झाला असून त्यांना २ मिनिटेही नीट बोलता येत नाही, असे त्यांनी स्वतःच सोशल मीडियावर पोस्ट करुन सांगितले. माझ्या दोन्ही डोळ्यांवर पंधरा दिवसांपूर्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. पद्मश्री डॉ.टी. पी. लहाने यांच्या मार्गदर्शनाखाली या शस्त्रक्रिया पार पडल्या आहेत. साधारण दहा दिवस त्यांनी डोळ्यांची काळजी विशेषतः तीव्र प्रकाश, धूळ आणि उन्हा पासून काळजी घेण्याचा सल्ला दिला होता. त्याच दरम्यान मला Bell's palsy नावाच्या आजाराचे निदान झाले. त्याच्यावरील उपचाराचे निदान सध्या रिलायन्स हॉस्पिटल मधील प्रसिद्ध डॉ. अरुण शहा यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या आजारामुळे सध्या मला सलग दोन मिनिटही व्यवस्थित बोलता येत नाही. त्यामुळे,



सध्या एक-दोन कॅबिनेट बैठका आणि पक्षाच्या जनता दरबार कार्यक्रमाला मला उपस्थित राहता आले नाही, अशी माहिती मंत्री मुंडे यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टममधून दिली. तसेच, याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच आमच्या पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार यांना कल्पना दिलेली आहे. लवकरच या आजारावर मात करून मी पुन्हा जनसेवेच्या कामात रुजु होईल, असेही धनंजय मुंडेंनी आपल्या पोस्टमधून म्हटलं आहे. बेल्स पाल्सी ही एक मेंदूशी संबंधित म्हणजेच न्यूरोलॉजिकल समस्या आहे, ज्यामध्ये चेहऱ्याची नस (फेशियल नर्व) कमजोर होते किंवा प्रभावित होते, त्यामुळे चेहऱ्याच्या एका बाजूला तात्पुरता लकवा सदृश्य स्थिती निर्माण होते.

# संदीपभैय्यांना मानावेच लागेल-मनोज जरांगे पाटील

### जल्लोष शिवजयंतीचा! बीडमध्ये ऐतिहासिक शिवजयंती साजरी ; सांस्कृतिक कार्यक्रम, साहसी खेळांची बीडकरांना मेजवानी

बीड-प्रतिनिधी दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या माध्यमातून, आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली डीजेमुक्त आणि वर्गणीमुक्त सांस्कृतिक शिवजयंती सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बीडकरांना विविध कला-क्रीडा सादरीकरणाच्या माध्यमातून अनोखी मेजवानी मिळाली. अशा प्रकारची शिवजयंती मी पहिल्यांदाच पाहतोय. अशा प्रकारचे कौतुकास्पद नियोजन आणि आयोजन आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. महिला भगिनींनाही शिवजयंती उत्सवात सहभागी होता येईल याची काळजी शिवजयंती उत्सव समितीकडून घेतली जाते. ही विशेष बाब आहे. यासाठी तर



संदीपभैय्यांना मानावेच लागते. अशा शब्दांत संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आ.संदीप क्षीरसागर व शिवजयंती उत्सव समितीचे कौतुक केले. सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहक्ष यांच्या आयोजनातून बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर बुधवारी (दि.१९) रोजी शिवजन्मोत्सव सोहळ्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी लाखो शिवप्रेमींनी या कार्यक्रमाचा मनमुक्त आनंद घेतला. आ.संदीप क्षीरसागरांनीही ढोलताशांच्या आणि शिवगीतांवर ठेका धरला होता. हे पाहून तरुणाई भारावली होती. या कार्यक्रमास बीड शहरासह ग्रामीण भागातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, लाखो शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते. असे होते सांस्कृतिक कार्यक्रम - करवीर नाद ढोल पथकाच्या तब्बल ४५० कलाकारांचे सादरीकरण - तिबेटीयन माँक यांचे शाओलीन मार्शल आर्ट या चित्तथरारक साहसी खेळाच्या सादरीकरणाने प्रेक्षकांच्या काळजाचा ठोका चुकवला. -पश्चिम बंगाल येथील ङ्गरायबिशी आर्ट स्कूलफ नावाच्या पथक ऍक्रोबाईक्स फाईट आणि वेगवेगळे चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर केली. -ओडिशा राज्यातील ङ्गदुलदुली बाजाफ नावाचे आदिवासी वाद्य पथकाने आपली लोकनृत्य सादर केले. -आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लाईट आणि लेजर शो-ने प्रेक्षकांचे लक्ष वेधल

# पराभवाची जबाबदारी घेण्याची शिकवण शिवचरित्रातून मिळते-शिवाजी जगताप

बीड-प्रतिनिधी श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ संचलित राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दि. १९ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, मॉसाहेब जिजाऊ व छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या प्रतिमेस संस्थेचे अध्यक्ष इंजि.बलभीमराव जाहेर पाटील, सचिव प्रा.जे.पी.शेळके, सहसचिव विठ्ठलराव जोगदंड, प्राचार्य ए.आर. डंबरे, ऋषिकेश जाहेर पाटील, मुख्याध्यापिका कदम एस.डी., मुख्याध्यापक आर.टी. राऊत, प्राचार्या श्रीम.लोखंडे आर. डी.यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. कदम एस.डी. यांनी करतांना त्यांनी कार्यक्रमाची पार्श्वभूमी व छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा थोडक्यात परिचय करुन दिला. यावेळी विद्यालयाच्या प्रांगणात शिवचरित्रावर शिवाजी जगताप यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यातील प्रत्येक प्रसंगाचे वर्णन करतांना शिवाजी जगताप म्हणाले की, रामायण, महाभारतात विविध राजांचे दाखले दिले जातात. हे राजे शूरवीर होते, दानशूर होते, न्यायी होते

# बाळनाथ विद्यालय चाकरवाडी शाळेत दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला.

बीड प्रतिनिधी - बीड तालुक्यातील श्री क्षेत्र चाकरवाडी येथील बाळनाथ विद्यालय चाकरवाडी या शाळेतील १०वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न झाला. यावेळी या कार्यक्रमासाठी डॉ. ज्योतीताई मेटे, प्रा. फाटक सर, महसुल सहाय्यक महेश पवार, पत्रकार अभिजीत पवार, महसुल सहाय्यक आकाश चौधरी, मस्के तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यावेळी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले या मधे श्वेता खराडे, स्वरूपा जगताप यांनी मागील सहा वर्षांमधील



आठवणीना उजाळा दिला. निरोप समारंभाच्या वेळी सर्व मुले भावूक झाली होती. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. ज्योतीताई मेटे म्हणाल्या की विद्यार्थ्यांना ज्या कार्यक्रमातून प्रोत्साहन भेटते ते कार्यक्रम आयोजित करावेत. दहावी च्या विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांना सामोरे जावे. विद्यार्थांनी अपयश जरी आले तरी निराश न होता जोमाने अभ्यास करावा, यश आपलेच आहे. तसेच शाळेचा माजी विद्यार्थी महसूल सहायक पदी निवड झालेला महेश पवार यांनी सुद्धा त्यांच्यावर पुढे जात असताना किती संकटाचा सामना करावा लागला हे सांगितले. विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन परीक्षा संबंधी माहिती दिली. त्यात ते म्हणाले दहावी हा एक महत्त्वाचा टप्पा असून कोणत्याही प्रकारचा ताण तणाव विद्यार्थ्यांनी ठेवू नये. सद्गुरूंच्या ध्यानाने परीक्षेची सुरुवात करावी. मनावर कोणत्याही प्रकारचे दडपण न ठेवता अभ्यास करा. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नववी च्या विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेतली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तृप्ती कदम आणि कोमल खिंडकर यांनी केले आणि आभार श्रुती कदम यांनी मानले.

# शिवजन्मोत्सव व मराठा भूषण पुरस्कार सोहळ्यास उपस्थित रहा मराठा सेवा संघ बीड



(बीड प्रतिनिधी) मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत सर्व कक्ष यांच्या वतीने दरवर्षी शिवजन्मोत्सव सो-हळा मोठ्या उत्साहात साजरा केला जातो या वर्षीही शिवजन्मोत्सव सोहळा २१ फेब्रुवारी रोज शुक्रव-ारी ठीक सायं. ७ वा यशवंतराव चव्हाण नाट्यगृह बीड या ठिकाणी संपन्न होत आहे. याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत शिवश्री ज्ञानेश महाराव सर यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.याच कार्यक्रम ात सामाजिक व उद्योग क्षेत्रात कार्यरत रमेश भाऊ पोकळे व वैद्यकीय क्षेत्रात कार्य करणारे डॉ. शरद शिंदे यांना मराठा समाज भूषण पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अशोक थोरा-त,उपमुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.ज्ञानेश मोकाटे,जिल्हा कोषागार अधिकारी शिवश्री एल.पी. गळगुंडे तहसीलदार शिवश्री चंद्रकांत शे-ळके गटविकास अधिकारी शिवश्री प्रवीणकुमार वानखेडे,मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोक ठाकरे हे उपस्थित राहणार आहेत तरी सर्व शिवप्रेमींनी शिवजन्मोत्सव सोहळयास उपस्थित राहून कार्यक्रम ाची शोभा वाढवावी असे आवाहन मराठा सेवा संघ बीड व अंतर्गत कक्षाच्या वतीने करण्यात येते.

# विद्यार्थ्यांनी ध्येयप्राप्तीसाठी एकनिष्ठ राहिले पाहिजे- अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके

## स्वामी विवेकानंद शाळेमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न

-केज प्रतिनिधीः-केज जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर ड माध्यमिक विभाग या शाळेमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून अंकुशराव इंगळे अध्यक्ष, जीवन विकास शिक्षण मंडळ तथा सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती केज, तर प्रमुख पाहुणे म्हणून अंबेजोगाई येथील अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती. चेतनाताई तिडके या उपस्थित होत्या. प्रमुख उपस्थित मान्यवरांमध्ये डॉ. वसुदेव नेहरकर उपसभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती केज, संस्थेचे सचिव गिन्यानदेव गदळे, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते.कार्यक्रम ाच्या सुरुवातीस उपस्थित मान्यवरांचे स्वागत प्रबोधकांत समुद्रेयांनी शब्द सुमणे अंत करणेफ हे गीत गाऊन केले. कार्यक्रमाचे प्रस्तावित पाहुण्यांचा परिचय संस्थेचे सचिव गिन्यानदेव गदळे यांनी दिला याप्रसंगी ते म्हणाले, विद्यार्थ्यांनी भविष्यातील विविध आव्हानांना सामोरे जाताना कोणत्याही मोहाला बळी न पडता ध्येयाकडे वाटचाल करावी.पुढे दहावीतील काही जीवन विकास शिक्षण संध्या के संचलितस्वामी विवेकानंद विद्या मंदिर(म ाध्यमिकविभाग)विद्यार्थ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या, याप्रसंगी त्यांनी शिक्षकाप्रती





आभार सुमने मांडताना आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चेतना तिडके याप्रसंगी बोलताना म्हणाल्या, शाळेच्या पहिल्या दिवशी आईचे बोट धरून शाळेतन जाण्यासाठी आपण रडतो, आणि शाळेच्या शेवटच्या दिवशी शाळा न सोडण्यासाठी रडतो. शालेय जीवनातून आपण ब-याच गोष्टी आत्मसात करत असतो परंतु जीवनामध्ये ध्येय प्राप्तीसाठी आपण एकनिष्ठ राहिले पाहिजे तरच आपण यशस्वी होऊ शकतो. या स्पर्धेच्या युगात टिकायचे असेलतर प्रत्येकाला स्वतःच वेगळं अस्तित्व निर्माण कराव लागेल. मवाचनानेच सामर्थ्य मिळतफ तेंव्हा अभ्यासाचे योग्य नियोजन करणे गरजेचे आहे.डॉ. वसुदेव नेहरकर याप्रसंगी बोलताना म्हणाले, विद्यार्थ्यांनी संस्कारक्षम शिक्षण घ्यावे. या शाळेतील विद्यार्थी व शिक्षक यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे नाते आहे. तेंव्हा ही शाळा गुणवत्तेसाठी नामांकित असणा-या म राठवाड्यातील अग्रगण्य शाळेपैकी एक शाळा आहे.अध्यक्षीय समारोपात अंकुशराव इंगळे म्हणाले, विद्यार्थ्यांनी दहावी बोर्डाच्या परीक्षेम ध्ये सर्वाधिक गुण घेऊन आपल्या शाळेचे नावलौकिक करावे. शिक्षकांनी घेतलेल्या कष्टाचे फळ, तुमच्या गुणवत्तेतून दिसून यावेत ही अपेक्षा आहे.याप्रसंगी संघर्ष पत्रकार संघ केज आयोजित तालुकास्तरीय नृत्य स्पर्धेमध्ये आपल्या शाळेतील इयत्ता सहावी अ मधील विद्यार्थिनींनी शेतकरी नृत्य सादर करून या स्पर्धेतील तृतीय पारितोषिक ड सन्मानचिन्ह व ५५५५ रुपये रोख पटकाविले, तसेच इयत्ता नववी अ मधील विद्यार्थिनी अक्षरा येडे हिने वैयक्तिक नृत्यांमध्ये द्वितीय पारितोषिक ड सन्मानचिन्ह व ३३३३ रुपये रोख पटकाविले, त्याबद्दल विद्यार्थ्यांसह मार्गदर्शक प्रबोधकांत समुद्रे यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शेतकरी लोकगीत कुर्या चालल्या रानात नृत्यातील सहभागी विद्यार्थी प्राची ढोबळे, अपूर्वा सोनवणे, श्रावणी लोंढे, श्रेया धपाटे, संस्कृती गायकवाड, तेजस्विनी कापरे, सृष्टी अडसूळ, राजनंदिनी सोनवणे, श्रद्धा काकडे, श्रुती सावंत, किशोरी मुळे, नंदिनी सपाटे आदी. कार्यक्रमाच्या सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले तर आभार अजय देशपांडे सर यांनी मानले याप्रसंगी त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना परीक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन करताना यशस्वी माजी विद्यार्थ्यांचे कौतुकही केले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार २१ फेब्रुवारी २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

# भारतीय संघाला शुभेच्छा!

जगातील आठ सर्वोत्तम संघात खेळली जाणारी क्रिकेटची चॅम्पियन ट्रॉफी अर्थात मिनी वर्ल्डकप स्पर्धा पाकिस्तान आणि दुबई येथे १९ फेब्रुवारी पासून सुरू झाली असून या स्पर्धेतील पहिला सामना यजमान पाकिस्तान व न्युझीलंड या दोन देशात पार पडला. या स्पर्धेतील भारताचा पहिला सामना काल म्हणजे २० फेब्रुवारी रोजी बांगलादेशशी दुबईत आज होणार आहे. भारताचा दुसरा सामना पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी रविवारी अर्थात २३ फेब्रुवारी रोजी दुबईत होईल. केवळ भारत पाकिस्तानमधील क्रिकेट रसिकांचेच नव्हे तर जगभरातील क्रिकेट रसिकांचे लक्ष या सामन्याकडे लागले आहे. भारत पाकिस्तान हा हाय व्होल्टेज सामना दुबईत रंगणार असून नेहमीप्राणेच हा सामना अटीतटीचा होईल यात वाद नाही. भारताचा न्युझीलंडशी १२ मार्च रोजी मुकाबला होईल. भारताच्या गटात बांगलादेश, पाकिस्तान आणि न्युझीलंड हे देश आहेत. यातील भारत पाकिस्तान आणि न्युझीलंड हे तिन्ही देश या स्पर्धेतील माजी तसेच संभाव्य विजेते म्हणूनही गणले जातात त्यामुळेच या ग्रुपला ग्रुप ऑफ डेथ असे म्हंटले जाते. भारताला उपांत्य फेरी गाठायची असेल तर किमान दोन सामने जिंकावे लागतील ते ही चांगल्या धावगतीने कारण ग्रुप मधील तीन संघाने जर प्रत्येकी दोन विजय मिळवले तर ज्यांची धावगती चांगली आहे अशाच दोन संघाला उपांत्य फेरीत प्रवेश मिळेल. भारताला खरा धोका आहे तो पाकिस्तान आणि न्युझीलंड या दोन देशांशी कारण हे दोन्ही देश धोकेदायक समजले जातात. अलीकडच्या काळात भारताने पाकिस्तानवर वर्चस्व गाजवले असले तरी मागील म्हणजे २०१७ च्या चॅम्पियन ट्रॉफी मधील अंतिम सामन्यात पाकिस्ताननेच भारताला नमवले होते हे विसरून चालणार नाही. न्युझीलंड हा आयसीसी ट्रॉफी स्पर्धेत कायम भारताला जड गेलेला देश आहे. आयसीसी ट्रॉफी स्पर्धेत न्यूझीलंडचा भारताविरुद्धचा रेकॉर्ड चांगला आहे म्हणून भारताने या दोन्ही देशांशी खेळताना सतर्क राहायला हवे. जर भारताने या दोन देशांना नमवले तर भारत उपांत्य फेरीत पोहचेल. भारत उपांत्य फेरीत पोहचला तर अंतिम फेरीत नक्की पोहचेल इतकेच नाही तर भारत चॅम्पियन ट्रॉफीवर नाव देखील कोरेल असा विश्वास अनेक दिग्गज आजी माजी क्रिकेटपटुंना आहे त्याचे कारणही तसेच आहे भारतीय संघ सध्या फॉर्मात आहे. नुकत्याच झालेल्या इंग्लंड विरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत भारताने एकतर्फी विजय मिळवत इंग्लंडला व्हाईट वॉश दिला. विशेष म्हणजे या मालिकेत भारताच्या सर्वच खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. भारताचा कर्णधार रोहित शर्मा याने इंग्लंड विरुद्ध शतक झळकावून फॉर्मात आल्याचे दाखवून दिले. ऐन चॅम्पियन ट्रॉफीच्या तोंडावर रोहित शर्मा फॉर्मात आला हे भारतासाठी शुभचीन्ह आहे. रोहित शर्मा फॉर्मात असला की तो भारताला एकहाती विजय मिळवून देतो. रोहित शर्मा सोबतच भारताचा मॅच विनर आणि जगातील सर्वोत्तम फलंदाज विराट कोहली हा देखील फॉर्ममध्ये आला आहे. हे दोघे भारताचे जय विरू आहेत. हे दोघे फॉर्मात येणे म्हणजे भारताचे निम्मे काम फत्ते होणे. या दोघांना शुभमन गिल, श्रेयस अय्यर आणि के एल राहुल यांची साथ मिळेल. यातील गिल आणि श्रेयस हे दोघेही फॉर्मात आहेत. राहुलने मोठी खेळी केली नसली तरी मोठ्या स्पर्धेत तो आपला खेळ उंचावतो. हार्दिक पांड्या आणि रविंद्र जडेजा हे भारतचे अष्टपैलू खेळाडू फलंदाजी आणि गोलंदाजीत कमाल करू शकतात तसेच त्यांचे क्षेत्ररक्षण ही उत्तम आहे. कुलदीप यादव आणि अक्षर पटेल हे फिरकीची तर मोहंमद शमी आणि अर्षदीप सिंग हे वेगवान गोलंदाजीची धुरा सांभाळतील. जसप्रीत बुम्राची उणीव जाणवणार असली तरी शमी आणि अर्षदीप आपल्या वेगवान गोलंदाजीने प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणतील यात वाद नाही. भारताप्रमाणेच ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तान या संघाकडे संभाव्य विजेते म्हणून पाहिले जात असले तरी भारतीय संघ या स्पर्धेतील सर्वात बलाढ्य संघ आहे. जर भारताच्या खेळाडूंनी त्यांच्या क्षमतेनुसार खेळ केला तर २०१३ नंतर प्रथमच भारत चॅम्पियन ट्रॉफीवर नाव कोरेल आणि १४४ कोटी देशवासीयांना जल्लोष करण्याची संधी मिळवून देईल यात शंका नाही.

# शिवराय आणि संयमीपणा

संघर्षाने भरलेले मानवी जीवन अनेकदा माणसाला हतबल बनवते. संकट समयी निर्बल्यावस्था येते. आपण काहीच करू शकत नाही अशी मनोवस्था तयार होते. संत तुकाराम महाराज म्हण तात, रात्रंदिन आम्हा प्रसंग. आमचा संघर्ष सुरूच आहे. हा संघर्ष प्रापंचिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, व्यावसायिक विविध स्तरावर आहे. अनेकदा या संघर्षात हतबल झा-लेले, परिस्थितीला समजून न घेता गलितगात्र झालेले, अविचाराने संयम हरवून देह संपवून बसतात. संयमाची कास सोडणा-्यांना शिवचरित्र मार्गदर्शन करते. संघर्षासाठी व संयम ासाठी बळ देते. शिव इतिहास अनेकदा संघर्षाची कहाणी म्हणून आपण वाचतो परंतु या इतिहासात संयम हा गुण सुद्धा दिसतो. समोर आलेले संकट हे आपला विजयी वारू अडवण्यासाठी नाही तर पुढील यशाच्या नियोजनासाठी मिळालेला वेळ देतो. हा सकारात्मक विचार आपल्याला अधिक बलवान बनवतो.

संयम म्हणजे हतबलता किंवा हार मानणे नव्हे तर, अत्यंत कठीण परिस्थितीतही तोल ढळू न देता सकारात्मक विचारातून पुढील संधीची वाट पाहणे किंवा संधी निर्माण करण्यासाठी कृती करणे होय. शिवचरित्रात आम्हाला हा संयम ठायी ठायी दिसतो. आपला पुत्र स्वराज्य निर्माण करील, रयतेचे राज्य निर्माण करील असे स्वप्न पाहणा-्या जिजाऊ, ज्या दिवशी शिवराय सिंहासनावर बसतात, छत्रपती होतात त्या दिवशी त्यांच्या डोळ्यातून झरणारे आनंदाश्रू हे या संयमाचेच रूप आहे. हा संयम एक दोन दिवसाचा नव्हे, एक-दोन वर्षाचाही नव्हे तर तब्बल चव्वेच युद्धाचा ाळीस वर्षांचा आहे. असंख्य अपम दिनरातान, मानसिक छळ भोगणारी आणि पाहणारी माता स्वपुत्राला राजा होताना पाहते. स्वराज्य प्रतिज्ञा ते राज्याभिषेक यामध्ये जे अंतर आहे ते अंतर म्हणजे जिजाऊंचा संयम आहे. आपल्या म तापित्याकडून घेतलेला हा गुण शिवरायांच्या ठायी दिसून येतो. स्वराज्य निर्माणाची प्रतिज्ञा घेणारे शिवराय जेव्हा गावोगावच्या पाटील, कुलकर्णी, वतनदारांना स्वराज्य कार्यासाठी प्रेरणा देत असतील तेव्हा सगळच तयार झाले असतील का? वर्षानुवर्ष येथील अस्थिर असण- ारी राजव्यवस्था, नव्याने बदलून येणारी त्याहून मोठी बलशाली शासनव्यवस्था, केवळ अन्यायअत्याचाराकरिताच सत्ता मिळवण तरी सुलतानशाही या सा-्याला विटलेली व शरणागतीतच सुख आहे असे मानणा-्या तत्कालीन मराठा मंडळींनी शिवरायांच्या पहिल्याच आवाहनाला प्रतिसाद दिला असेल का? तर नक्कीच नाही. अशा वेळी आज नाही उद्या ही मातब्बर मंडळी आपल्याकडे येतील. स्वराज्य कार्याची गरज त्यांना आज ना उद्या पटेल. आपण स्वराज्याचे सामर्थ्य जेव्हा त्यांच्या नजरेत भरू तेव्हा ही माणसे आपल्याकडे वळतील आणि त्यासाठी वाट पाहावी लागेल. हा संयम राखणारे राजे अनेक मराठा स्वराज्याकडे वळण्याची वाट पाहत राहिले. शिवरायांचे सामर्थ्य, धैर्य व विचार पाहून अगोदर स्वराज्य कार्यात सामील होण्यास तयार नसणारे बाजीप्रभू कालांतराने स्वराज्य कार्यात सहभाग घेतात. नुसते सहभाग घेत नाहीत तर, स्वराज्यासाठी प्राणार्पण करतात. जावळीच्या मो-्याशी निष्ठा वाहणारे मुरारबाजी आपल्याला हवे आहेत. जावळी आपण काबीज करूच पण जावळी विजयात मुरारबाजी नाव-चा हिरा स्वराज्यात हवा. यासाठी वाट पाहणारे राजे मुरारबाजीचे मत परिवर्तन करतात. जावळीच्या म ो-्यांच्या सेवेत असणारे मुरारबाजी शिवरायांकडे येतात. त्यांना पुरंदरचा किल्लेदार करतात. हेच मुरारबाजी पुढे सहजरित्या विजय मिळवण्याचा मनसुबा राखणा-्या दिलेरखानाच्या राक्षसी आकांक्षेला सुरुंगला-वतात. मुरारबाजीची गुणवत्ता जाणणारे राजे, मुरारबाजी आज ना उद्या येईल यासाठी संयम दाख-वणारे राजे व राजांनी राखलेल्या संयमाचे मिळालेले फळ या घटनेतून दिसते. संयमाचे मोल जाणता येते



शहाजीराजांना अतिशय अपमानकारकरीत्या आदिलशाही दरबारात हजर करून तुझ्या पुत्राने केलेली बंडाळी थांबव अशी धमकी वजा सूचना देणा-्या आदिलशाही दरबारात शहाजीराजे कैदेत पडतात. जिजाऊंचा पती आणि शिवरायांचे पिता कैदेत आहेत हा आघात या म ाता पुत्राने कसा सहन केला असेल ? त्याहूनही पुढे, स्वराज्य बाळसे घेत होते. तोरणा, भोरप्या डोंगर, मुरूबदेवाचा डोंगर, असे किल्ले, मुलुख ताब्यात घेऊन विजयाची घोडदौड करणारे राजे व त्यांचे सहकारी आनंदात आहेत. कोंढाणा सारखा मजबूत किल्ला हाती गताचं स्वराज्यसूर्य उगवण्यास सुरुवात झाली ही त्यांची आहे. अशा प्रसंगी, शहाजींना सोडतो कोंढाणा आदिलशाहीस दे ही मागणी होते. त्यावेळी पितृप्रेम ाने किल्ला देऊन शहाजीराजांना सोडवणारे राजे पुढे काही वर्ष शांतपणे अर्थातच अतिशय संयम राखून पुढील धोरणे आखतात. या शांतीपर्वात ताब्यातील किल्ल्यांची डागडुजी, परिसरातील व्यवस्था व पुढील राजकारणाची दिशा ठरवतात. भोरप्या डोंगरावर प्रता पगड व मुरूम देवाच्या डोंगरावर राजगड हे किल्ले नव्याने उभारतात. राजांनी या काळात दाखवलेला संयम पराकोटीचा आहे. याच संयम ातून स्वराज्याची पहिली राज धानी सजली. याच संयमाने उद्या येणा-या अफजलखांनी संकटाला सामोरे जाण्यासाठी प्रतापगड उभा ठाकला. पडत्या काळातील संयम ही भविष्यातील यशाची बेगमी असते.

मिर्झाराजे व दिलेरखान स्व ारीत आज ना उद्या आपल्या हाती काहीतरी लागेल या क्षेने कालव्यतीत करणारे शिवराय, संपूर्ण शरणागती मागणा-्या मि र्झाराजांकडून बारा किल्ले स्वतः कडे राखण्यात यशस्वी होतात. या सर्व तहकाळात स्वराज्याची होणारी नुकसानी, पुरंदरावर होणारे हल्ले हे राजांना अस्वस्थ करणारे होते मात्र त्या काळातही सारी परिस्थिती अतिशय संयमीपणे हाताळणा-्या राजांनी पुरंदरचा तह यशस्वी करून स्वराज्य रयत वाचवली. काही प्रम ला ाणात स्वराज्य राखले. हे महत्त्वाचे!

आता सारे संपले अशी म भावना ानसिकता बनलेल्या शंभूराजासहित आपल्या साथीदारांना धीर धरा मार्ग निघेल असे आश्वासित करणा-्या राजांनी कैद ते सुटका या काळात दाखवलेला संयम स्वतः चे धीरोत्तमत्व दर्शवणारे आहे. आग्रा कैदेतून निसटल्यानंतर छोट्या शंभूला मागे मथुरेत ठेवताना एका बापाने आपल्या काळजावर दगड ठेवला. त्याची वेदना केवढी असेल? शंभूबाळाचा मृत्यू झाला अशी खोटी माहिती सांगताना कंठात दाटलेला हुंदका आणि त्यानंतर महिना दोन महिन्यांनी शंभूराजांचे सुखरूप रायगडावर येणे या दोन घटनांमध्ये जो काळ लोटला तो काळ म्हणजे शिवरायांच्या संयमाची पराकाष्ठा होय. शंभूराजांच्या मृत्यूच्या बातमीनंतर जिजाऊंनी फोडलेला टाहो असेल, येसूबाईचं विधवा होण असेल किंवा मृत्यूचे सारे विधी करणे असेल यामध्ये मनाची झालेली शिवरायांची घालमेल संयम अपोची प्रमोच्चता दाखवणारी आहे. संयम हे वीरा चे लक्षण आहे. रणांगणावर शौर्य गाजवणारा आणि अटीतटीच्या क्षणाला संयम दाखवणारा मनुष्य विरच म्हणायला हवा. आज आम्ही फास्टफूड आणि इन्स्टंट इफेक्ट च्या दुनियेत जगणार्याला, संयम या गुणांचा आमच्याशी सुतराम संबंध लागत नाही. आज जे हवं ते झटपट. आम्हाला झटपट पैसा, झटपट पदे, झटपट प्रतिष्ठा हवीय. संघर्ष आणि संयम आमच्या जवळही फिरत नाही. ब्रेकिंग न्यूज च्या माध्यमातून अर्धवट व अनेकदा एकांगी बातमी इतक्या जलद प्रसिद्ध करतो जणू या बातमी प्रसिद्धीमुळे आम्हाला एखादे मोठे पदक मिळणार आहे. रसायनांचा वापर करून ऋतुबाह्य फळे भाजीपाला चढ्या भावात विकताना आम्ही विष विकतो आहोत याची साधी जाणीव आमच्यात नाही. निसर्गाचा संयम असह्य होऊन खताच्या वापरातून काल पेरलेली भाजी आज विकण्यास येते. आमचा संयम संपला आहे. वाट पाहणे म्हणजे काहीतरी संपून चालले आहे असे वाटते. खरे तर, जीवनातील संयम संपला की नियंत्रण सुटते, नियंत्रण सुटले की कार्यात विस्कळीतपणा येतो व हाच विस्कळीतपणा अपयशाकडे नेहतो.

शिवरायांनी त्यांच्या आयुष्यात योग्य त्या ठिकाणी आक्रमकता व योग्य त्या ठिकाणी संयम राखला आहे. हा संयमच शिवरायांना यशाकडे घेऊन गेला. अंधारलेल्या रात्री थड थांबून प्रकाशाचा एखादा कवडसा येईल का यासाठी काही प्रसंगी थांबावे लागते. ते थांबणे म्हणजे पराजय नव्हे तर पुढील वाट अधिक जलद व उत्साहाने चालण्यास मिळालेली संधी होय.

# शिवरायांच्या राज्यात महिला विषयक धोरण आणि आजची परिस्थिती

रांझाच्या पाटलाने बलात्कार केल्याचे सम जताच त्याचे हातपाय तोडून चौरंग केला. आज मात्र माता भगिनींची अब्रू लुटणारे हजारो नराधम न्यायालयाच्या छत्राखाली स्वतः ला वाचवण्यासाठी धडपडत आहेत ! म्हणून आजही शिवरायांच्या स्वराज्याची छाप प्रत्येकाच्या श्वासाश्वासात आहे.चार वर्षांपूर्वी हिंगणघाट येथे एकतर्फी प्रेमातून प्राध्यापिका असलेल्या तरुणीला एका नराधमाने जिवंत जाळल्याची घटना असो की कोपर्डीच्या बहिणीची झालेली निघृण हत्या असो की अगदी काल परवा बदलापुरात झालेला चिमुरडी वरील अत्याचार ! या सर्व घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. केवळ याच घटना नाही तर यासारख्या अनेक घटना रोजच या पावन भूमीत घडत आहेत. महिलांच्या अब्रूची लक्तरेवेशीवर टांगली जात आहे. आज या पावन भूमीत कोणतीच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. नराधमांना कायद्याचा धाक नाही. नराधमांना अटक होते त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून जनतेतून उठाव होतो. मोर्चे निघतात. अनेक वर्ष न्यायालयात खटला चाल-तो. या नराधमांना फाशी होईल अशी अपेक्षा असताना त्यांना जन्मठेपेची शिक्षा होते आणि ही शिक्षाही रद्द व्हावी यासाठी हे नराधम वरच्या न्यायालयात अपील करतात. दररोजचे वर्तम ानपत्र चाळलं तर त्यात विनयभंग, छेडछाड, बलात्काराची एकतरी बातमी दिसतेच. आजूबाजूला घडण-्या महिलांविरोधी गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या की शिवरायांच्या विचारांची, शिवरायांच्या धोरणाची कधी नव्हे इतकी गरज आज असल्याचे जाणवते.कारण शिवरायांच्या शिवशाहित महिला जितक्या सुरक्षित होत्या तितक्या त्या कोणत्याच काळात नव्हत्या. कारण शिवरायांचे म हिला विषयक धोरण. मध्ययुगीन काळात शिवरायांचा जन्म झाला. या काळात महाराष्ट्र परकीयांच्या गुलामगिरीत होता. शिवरायांनी महाराष्ट्राला परकीयांच्या गुलाम गिरीतून मुक्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा संकल्प केला. मराठी माणसांच्या मनात अस्मिता निर्माण केली. अठरापगड जातींना एकत्र करून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यात सर्वात मोठे कार्य म्हणजे म हिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सुधारणा, नियम आणि उचललेले कठोर पावले. त्यांचे हे पाऊल म्हणजे महिला मुक्तीसाठी केलेली क्रांतीच होती. हजारो वर्षांपासून चालू असलेल्या अनिष्ठ चालीरीती बदलण्याची धमक कोणत्याच राजाने दाखवली नाही, ती धमक शिवरायांनी दाखवली. त्यांनी स्वतःच्या आईला सती जाण्यापासून परावृत्त केले ही त्याकाळातील सामाजिक क्रांतीच होती. त्याकाळी महिलांना गुलामीची वागणूक दिली जात होती. महिलांची खरेदी विक्री केली जात होती. महिलांना गुलाम म्हणून वागवले जात होते. शिवरायांनी या सर्व गोष्टींवर बंदी आणली. शिवरायांचे महिलाविषयक धोरण अत्यंत आदराचे होते. जिजामाता या शिवरायांच्या गुरू होत्या. जिजामातेनेच त्यांना स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू पाजले म्हणूनच पर स्त्री मातेसमान मानणारा व शत्रूच्या स्त्रियांना सन्मान देणारा युगपुरुष म्हणून शिवरायांची इतिहासात नोंद झाली. शिवराय ख-्या अर्थाने रयतेचे राजे होते. रक्षणकर्ते होते. सैन्याला राजांचे सक्त आदेश होते. स्त्रियांना मोहिमेवर आणू नये, त्यांना युद्धात पकडू नये. स्त्री संबंधी गुन्ह्याला क्षमा नव्हतीच उलट कठोर शिक्षा होती, मग तो कोणीही असो. साधा शिपाई, वतनदार, किल्लेदार, कुणालाही माफी नव्हती. हातपाय तोडणे, देहदंड अशा कठोर शिक्षा दिल्या जात. रांझ्याच्या पाटलाने गरीब शेतक-याच्या तरुण मुलीला उचलून नेऊन भोगली. त्या तरुण मुलीने आत्महत्या केली. जेंव्हा ही गोष्ट शिवरायांना समजली तेंव्हा शिवरायांनी त्याच्या मुसक्या बांधून त्याला पुण्याला आणले. त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. जी गोष्ट रांझाच्या पाटलाची तीच गोष्ट कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची. तीच गोष्ट सकूजीगायकवाड या सेनापतीची. महिलांसबंधी गुन्ह्याला त्यांच्याकडे क्षमा नव्हती उलट कडक शिक्षाच होती. शिवरायांच्या या महिलाविषयक धोरणामुळेच महिला सुरक्षित होत्या. आजची परिस्थिती मात्र पूर्ण भिन्न आहे. महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. महिलांना सुरक्षा पुरवण्यात सरकार अपयशी ठरत आहे. कायदे असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला नाही. राज्यकर्त्यांनी शिवरायांच्या महिलाविषयक धोरणांचा अभ्यास करुन ते राबवण्याचा प्रयत्न केल्यास देशात शिवशाही अवतरल्याशिवाय राहणार नाही.

# सिपेटच्या विविध अभ्यासक्रमांसाठी ऑनलाइन प्रवेश अर्ज भरण्यास सुरुवात

छत्रपती संभाजीनगर, दि.२० :- केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्थान (सिपेट), रसायन व पेट्रोरसायन विभाग, रसायन व खते मंत्रालय, भारत सरकारचीची एक राष्ट्रीय स्वायत्त संस्था आहे. महाराष्ट्रातील प्लास्टिक्स उद्योगांना तांत्रिक सहायत्ता पुरवणे, या उद्योगांसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ विकसित करणे तसेच शंशोधन व विकासकामात सहायता करणे या उद्देशाने छत्रपती संभाजी नगर येथे सिपेट केंद्राची स्थापना २००६ मध्ये करण्यात आलेली आहे. सिपेट संस्था आयएसओ ९००१:२०१५ मानांकन प्राप्त असून या संस्थेमध्ये एआयसीटीई मान्यताप्राप्त तसेच एम एसबीटीई समतुल्य प्लास्टिक्स इंजिनीयरिंगचे अभ्यासक्रम चालविले जातात.




सिपेट मध्ये प्रवेश घेण्यासाठी दरवर्षी ऑल इंडिया लेवलची सिपेट अॅडमिशन टेस्ट (कॅट) घेण्यात येते व गुणवत्ते नुसार प्रवेश देण्यात येतो. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली असून, सिपेट च्या प्रवेश परीक्षेसाठीची नोंदणी https://cipet25.onlineregistrationform.org/CIPET>/ या संकेत स्थळावर सुरु झालेली आहे. सदरील प्रवेश परीक्षा हि ८ जुन २०२५ रोजी घेण्याचे प्रयोजन असून परीक्षेसाठीचे प्रवेश अर्ज २९.०५.२०२५ पर्यन्त सादर करता येतील. ज्या विद्यार्थ्यांनी यावर्षी दहावी, डीप्लोमा व बी.एस.सी (शेवटच्या वर्षाची) ची परीक्षा दिलेली आहे असे सर्व विद्यार्थी, निकाल लागण्याची वाट न बघता प्रवेश अर्ज भरू शकतात. तरी सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या सुवर्ण संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन सिपेटचे प्रशिक्षण प्रमुख मिलिंदकुमार भरणे यांच्या मार्फत करण्यात आलेले आहे.

सिपेट छत्रपती संभाजी नगर येथे जागतिक दज्याचे सुसज्ज असे कॅड / कॅम, टूल रूम, प्लास्टिक प्रोसेसिंग, प्लास्टिक टेस्टिंग विभाग असून ज्यातील आधुनिक मशिनरीज द्वारे प्लास्टिक उद्योगांना तांत्रिक सहाय्यता दिली जाते तसेच विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येते. सिपेटचे सर्व अभ्यासक्रम रोजगार व स्वयंरोजगाराच्या उद्देशाने तयार केलेले असून प्रॅक्टिकल आधारित संकल्पाने मुळे येथील विद्यार्थ्यांना रोजगाराच्या प्रचंड संधी उपलब्ध आहेत.

सिपेट छत्रपती संभाजीनगर येथे १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी डिप्लोमा इन प्लास्टिक टेक्नॉलॉजी (डीपीटी), डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड टेक्नॉलॉजी (डीपीएमटी) हे तीन वर्षाचे कोर्स चालविले जातात व बी.एस.सी. च्या विद्यार्थ्यांसाठी पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन प्लास्टिक प्रोसेसिंग । टेस्टिंग (पीजीडी-पीपीटी) हा २ वर्षाचा अभ्यासक्रम उपलब्ध आहे आणि ज्या विद्यार्थ्यांनी इंजिनीरिंग मध्ये डिप्लोमा केला असेल अश्या विद्यार्थ्यांसाठी पोस्ट डिप्लोमा इन प्लास्टिक मोल्ड डिझाइन (पीडी-पीएमडी) हा १८ महिन्याचा कोर्स करता येतो. कोर्स पूर्ण केल्यानंतर होतकरू विद्यार्थ्यांना प्लास्टिक्स इंजिनीयरिंग मध्ये आपले उज्वल भविष्य घडवता येईल व त्यांना रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या भरपूर संधी उपलब्ध होतील. अधिक माहितीसाठी ९३७३६८७९१५ ९३२५६८७९०२, ०२४०-२४७८३२२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# पाकिस्तानची चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात धुलाइ

कराची-चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्याच सामन्यात पाकिस्तानची जोरदार धुलाई झाल्याचे संपूर्ण जगाने पाहिले. फक्त आठ षटकांतच पाकिस्तानच्या संघाचा जोरदार गेम झाल्याचे या सामन्याच पाहायला मिळाले. पाकिस्तानचा संघ पहिल्याच सामन्यात गोलंदाजी करण्यासाठी उतरला आणि सुरुवा-तीला त्यांनी चांगला मारा केला. पण त्यानंतर पाकिस्तानचे गोलंदाज हुरळ-ून गेल्याचे पाहायला मिळाले. कारण पाकिस्तानला त्यानंतर सामन्यावरची पकड मजबूत करता आली नाही. न्यूझीलंडकडून विल यंगने शतक झळकावत पाकिस्तानच्या गोलंद-ाजीला खिंडार पाडण्याचे काम केले. यंगने यावेळी १०७ धावांची खेळी साकारली. त्यानंतर टॉम लथमनेही शतकाची वेस ओलांडत संघाला मोठी धावसंख्या उभारण्यात मोलाचा वाटा उचलला. या दोघांच्या शतकांच्या जोरावर पाकिस्तानने ११८ धावांचा डोंगर उभारला होता. पाकिस्तानचा न्यूझीलंडने अखेरच्या आठ षटकांत जोरदार गेम केला. पाकिस्ताननचा वेगवान गोलंदाज शाहीन आफ्रिदी यावेळी सर्वात महागडा ठरला. शाहीनने १० षटकांत ६८ धावा दिल्या आणि एकही विकेट त्याला मिळवता आली नाही. अखेरच्या षटकांत न्यूझीलंडच्या फलंदाजांनी त्याचा चां-गलाच समाचार घेतला. न्यूझीलंडची ४२ व्या षटकात ४ बाद २१५ अशी अवस्था होती. त्यामुळे ते ३०० धाव-ांचा पल्लाही गाठणार नाही, असे वाटत होते, पण अखेरच्या आठ षटकांमध्ये पाकिस्तानच्या गोलंदाजांची हजामत केल्याचे पाहायला मिळाले. कारण अखेरच्या आठ षटकांत न्यूझीलंडच्या फलंदजांनी तब्बल १०५ धावांची लूट केली आणि ३२० धावांची मोठी धावसंख्या उभारली. यामध्ये न्यूझी-लंडच्या ग्लेन फिलीपचा सर्वात मोठा वाटा होता. फिलीपने ३९ चेंडूंत ३ चौकार आणि चार षटकारांच्या जोरा-वर नाबाद ६१ धावांची खेळी सा-कारली. पाकिस्तानसाठी हे आव्हान मोठे समजले जात आहे. कारण यापू-र्वी झालेल्या तिरंगी मालिकेच्या अंतिम सामन्यात पाकिस्तानला ३०० धावाही करता आल्या नव्हत्या. त्यामुळे आता विजयासाठी असलेल्या ३२१ धावा पाकिस्तानचा संघ कसा करणार, याची उत्सुकता आता सर्वांना लाग-लेली असेल. कारण पहिला सामना पाकिस्तान जिंकणार की नाही. याकडे सर्वांचे लक्ष असेल

## ऊसतोड कामगारांच्या मुलांची एमपीएससी परिक्षेत , महसूल सहाय्यकपदी कन्हैय्या बिवसेन मुंडे वर्णी



नांदुरफाटा/वार्ताहरः-बीड तालुक्यातील निवडुंगवाडी येथील कन्हैया बिवसैन मुंडे यांनी नुकत्याच एमपीएससी निकालात घवघवीत यश संपादित करुन, ऊसतोड मजुरांच्या मुलाने ध्येय, चिकाटी, परिश्रम याच्या जोरावर महसूल सहाय्यकपदी निवड झाली असुन त्याच्या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे, यशस्वी होण्यासाठी जिद्द, चिकाटी व, मेहनत घेतली तरि यश हे नक्कीच मिळते ,त्याने मिळवलेल्या यशाबद्दल परिसरात अभिनंदन होत असुन , युवकांनी अपयशाला खचुन न जाता जिद्द ठेवावी आसे आमच्या प्रतिनिशी बोलताना कन्हैया मुंडे यांनी सांगितले




# सुरेश धस यांच्यावरील विश्वास उडाला-मनोज जरांगे पाटील

## सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेऊन मराठा समाजाचा तर विश्वासघात केलाच पण माझा त्यांच्यावरला विश्वास उडाला आहे



जालना/प्रतिनिधीः- सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणामुळे राज्यातील राजकारण ढवळून निघाले आहे. या प्रकरणात आरोपींना अटक करण्यात आली असून एकजण अद्याप फरार आहे. यातच या प्रकरणी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी सातत्याने लावून धरली जात आहे. यामध्ये मनोज जरांगे पाटील, आ.धस, अंजली दमानिया आघाडीवर असल्याचे पाहायला मिळत आहे. भाजपा आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याची माहिती समोर आल्यानंतर आता या प्रकरणात महाविकास आघाडीचे नेते पुन्हा सक्रिय झाले आहेत. यातच मराठा आरक्षण मिळावे, यासाठी सुरू असलेले उपोषण स्थगित के ल्यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांनी आपला मोर्चा पुन्हा एकदा बीड प्रकरणाकडे वळवला आहे. आ. सुरेश धस यांच्या विषयी बोलतांना ते म्हणाले की, सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेऊन म राठा समाजाचा तर विश्वासघात केलाच पण माझा त्यांच्यावरला विश्वास उडाला आहे, असे म नोज जरांगे म्हणाले.मीडियाशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की,



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमच्या आठ मागण्यांपैकी चार मागण्या तात्काळ मंजूर केल्या होत्या. आता येणा-या २५ तारखेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हैदराबाद, सातारा आणि मुंबई गॅझेट लागू करतील आणि त्यांची आम्ही स्वागत करू. मुख्यमंत्री मराठा आरक्षणाचा निर्णय २५ तारखेला शंभर टक्के जाहीर करतील, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.ते म्हणाले की, धनंजय मुंडे यांना जनतेने मंत्री केले आहे.जनतेला वाटत असेल की, धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यायला पाहिजे होता तर तो त्यांनी द्यायला हवा होता. धनंजय मुंडे हा पैसा, पद आणि राजकारणाला हपापलेला माणूस आहे. त्या पैशाच्या जीवावर राजकारण करतो. आतापर्यंत ब-याच जणांनी आपल्यावर आरोप झाल्यानंतर पदांचा राजीनामा दिला आहे पण हा माणूस एवढा हपापलेला आहे की, त्याला सत्तेतील खुर्ची सुटत नाही, असा घणाघात म नोज जरांगे पाटील यांनी केला.
दरम्यान, आमदार सुरेश धस यांच्यावर मराठा समाजाने प्रचंड विश्वास टाकला होता.

# लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूलमध्ये पोषण आहार दिन उत्साहात साजरा विद्यार्थ्यांनी पौष्कि आहार पदार्थांचे दाखवले प्रदर्शन

केज दि.१५ ( प्रतिनीधी ) लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूलमध्ये शनिवार रोजी पोषण आहार दिना निमीत्त
या नर्सिंग स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पौष्टिक आहार पदार्थांचे प्रदर्शन दाखवले हा कार्यक्रम प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

केज शहरातील बीड रोडवरील लक्ष्मी मुंडे नर्सिंग स्कूलमध्ये पोषण आहार दिना निमीत्त विद्यार्थ्यांमध्ये पौष्टिक आहाराचे महत्त्व रुजवण्यासाठी लक्ष्मी नर्सिंग स्कूलमध्ये दि.१५ फ ेब्रुवारी शनिवार रोजी सकाळी विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते.
या कार्यक्रमांचे उध्दघाटन संस्थापक



अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे, माजी जि.प.सदस्या उषाताई मुंडे यांनी केले व या कार्यक्रमाला सुरुवात झाली.यावेळी विद्यार्थ्यांनी पौष्टिक आहाराचे महत्त्व पटवून देणारी विविध नाटके सादर केली.त्यांनी संतुलित आहाराचे फायदे,जंक फूडचे दुष्परिणाम आणि पारंपरिक भारतीय आहाराचे महत्त्व यावर प्रकाश टाकला.विद्यार्थ्यांनी तयार केलेले पौष्टिक पदार्थांचे प्रदर्शन सर्वांचे लक्ष वेधून घेत होते. या प्रदर्शनात विविध प्रकारची फळे,भाज्या, धान्ये आणि पौष्टिक स्नॅक्स मांडण्यात आले होते.या स्कूलच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना संतुलित आहाराचे महत्त्व सांगितले आणि जंक फूड टाळण्याचा सल्ला दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आहारात फळे,भाज्या आणि धान्यांचा समावेश करण्याचे महत्त्व पटवून दिले.या कार्यक्रमात शाळेतील शिक्षक आणि कर्मचा-यांनीही सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी विद्यार्थ्यांसोबत मिळून पौष्टिक पदार्थ तयार केले आणि त्यांच्यासोबत आहाराच्या सवयींवर चर्चा केली.या कार्यक्रमाचे मुख्य उद्देश
विद्यार्थ्यांमध्ये पौष्टिक आहाराचे म हत्त्व वाढवणे.संतुलित आहाराच्या फायद्यांविषयी जागरूकता निर्माण करणे.जंक फूडच्या दुष्परिणामांबद्दल माहिती देणे.पारंपरिक भारतीय आहाराचे महत्त्व पटवून देणे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पौष्टिक आहाराचे महत्त्व जाणून घेतले आणि त्यांच्या आहारात सकारात्मक बदल करण्याची प्रेरणा मिळाली. या कार्यक्रमासाठी संस्थापक अध्यक्ष रम ाकांत (बापू) मुंडे, माजी जि.प.सदस्या उषाताई मुंडे,सेवासोसायटीचे चेअरमण मधुर (भैय्या)मुंडे यांच्यासह अनेक मंडळी या कार्यक्रमाला उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य रवि पवार आणि नर्सिंग स्कूलचे विद्यार्थी व विद्यार्थीनी व कर्मचारी सोनवणेताई यांनी परिश्रम घेतले.

## परळीत धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्वराज्य सप्ताहाचे दिमाखदार उद्घाटन.

### छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त साकारले शिवकालीन प्रवेशद्वार



परळी वैद्यनाथ दि. २० (प्रतिनिधी) परळीत धनंजय मुंडे यांच्या संकल्पनेतून छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आज शिवजयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने पुढील सात दिवस आयोजित करण्यात येत असलेल्या स्वराज्य सप्ताहाचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, युवकनेते अजय मुंडे यांसह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तत्पूर्वी मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन सामूहिक अभिवादन करण्यात आले. यावेळी शिव घोषणांनी परिसर दणाणून गेला होता. धनंजय मुंडे यांनी स्वतः त्यांच्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून परळी शहरातील मुख्य चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारलेला आहे. याठिकाणी नाथ प्रतिष्ठान च्या वतीने शिवकालीन प्रवेशद्वार,विद्युत रोषणाई, तसेच खास सेल्फी पॉईंट उभारण्यात आले आहेत. याठिकाणी शिवप्रेमी नागरिकांनी प्रचंड गर्दी केलेली पाहायला मिळाली. दरम्यान पुढील सात दिवसात स्वराज्य सप्ताह या उपक्रमात विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व नागरिकांनी यात सहभागी व्हावे असे आवाहन तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके तसेच शहराध्यक्ष बाजीराव धम ाधिकारी यांनी केले आहे.

# राज्यातील लाडक्या ९लाख बहिणीचे १५००लवकरच बंद होणार

मुंबई(वृत्तसंस्था ):- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून कमी केलेल्या महिलांची संख्या ९ लाख होणार आहे. यापूर्वी ५ लाख महिलांची नावं कमी करण्यात आली होती. आता नव्याने ४ लाख महिलांची संख्या कमी होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे राज्य सरकारच्या ९४५ कोटी रुपयांची बचत होणार असल्याची माहिती आहे. नमो शेतकरी योजनेचा लाभआणि लाडकी बहीण योजनेचा लाभघेणा-या ५ लाख म हिला आहेत. या महिलांना लाडकी बहिण योजनेतील फक्त ५०० रुपये मिळणार तर नमो शेतकरी योजनेतून १००० रुपये मिळणार आहेत.दिव्यांग विभागातून लाभ मिळणा-या महिलांना लाडकी बहीण योजनेतून त्यांना वगळलं जाणार आहे. वाहनं असलेल्या अडीच लाख महिला आहेत त्यांना ही यातून वगळण्यात आलं आहे. सोबतच निकषात न बसणा-या अनेक महिला आहेत त्यांनी ही पैसे परत करायला सुरुवात केली आहे.मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे नवे निकषमुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी आता सरकारकडून नवे निकष लागू केले जातील. पात्र महिलांनाच योजनेचा लाभ मिळवा यासाठी सरकारकडून




आता कठोर पाऊले उचलली जाणार आहेत.लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांना दरवर्षी जून महिन्यात बँकेत ई-केवायसी करुन हयातीचा दाखलाही जोडावा लागणार आहे. दरवर्षी १ जून ते १ जुलै दरम्यान ई-केवायसी करावी लागणार आहे. ज्या महिला विविध सरकारी योजनांचा लाभ घेतात आणि ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांहून अधिक आहे, त्यांचा या योजनेतून अपात्र केलं जाणार आहे.लाभार्थी महिलांचे उत्पन्न अडीच लाखांहून अधिक आहे की नाही, हे तपासण्यासाठी राज्य सरकारकडून प्राप्तीकर विभागाची मदत घेतली जाणार आहे. नव्याने पात्र झालेले तसेच नव्याने आधार जोडणी केलेल्या लाभार्थ्यांना आता आधीच्या महिन्यांचा म्हणजेच जुलैपासून लाभ न देता अर्ज मंजूर झाल्याच्या पुढील महिन्यापासून लाभ दिला जाणार आहे.

# नागेशपुरी महाराज व रामकृष्ण महाराजानी भक्तांना जीवन जगण्याची प्रेरणा दिली ... महंत भगवान महाराज वरपगावकर

प्रतिनिधी । केजवै .ह.भ.प. रामकृष्ण म हाराजांच्या जयजयकाराने वरपगाव नगरी दुमदुमली असून यावेळी मान्यवरांनी व हजारो भाविक भक्तगणांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी अध्यात्मिक क्षेत्रातील अनेक म हाराज उपस्थित होते. त्यामुळे परिसर भक्तिमय दिसून आला व गावाला यात्रेचे स्वरूप आले होते.श्रीक्षेत्र साधू शिवरामपुरी मठ संस्थान वरपगाव ता केज येथील वै.ह.भ.प. रामकृष्ण महाराज यांच्या १९ व्या अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा महंत भगवान महाराज शास्त्री यांच्या मार्ग दर्शनाखाली ११ फेब्रुवारी ते १८ फेब्रुवारी दरम्यान भव्य दिव्य हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या सप्ताहामध्ये ज्ञानेश्वरी पारायण श्री परमपुज्य ह.भ.प. महेश महाराज टेकाळे व ह.भ. प. निलेश महाराज माने. ह.भ.प. सुकळीकर यांनी तर दुपारी २ ते ५ वाजेपर्यत भागवत कथा प. पु रामकृष्ण महाराज शासी आंळदीकर यांच्या रसाळ वाणी युक्त कथेमुळे भाविक व भक्तगण आणि
विशेषःत महिला वर्गाची अलोट गर्दी झाल्याम ुळे हा परिसर गजबजून गेला होता. यावर्षी हजारोंच्या संख्येने पंचक्रोशीतील भक्त उपस्थित होते. भक्तांमध्ये प्रचंड मोठा उत्साह संचारलेला दिसला.या सप्ताहामध्ये महाराष्ट्रातील अनेक नामवंत कीर्तनकार मान्यवरांची अमृततुल्य कीर्तने झाली. यावेळी आपापल्या परीने अनेक भाविकांनी अन्नदान करून उपस्थितांची सेवा केली. विशेष म्हणजे टॅक्टरमध्ये भरून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. येथे एक भक्ताचा महापूर आल्याचे दिसले.ह.भ.प. मच्छिन्द्र महाराजानी अनेकांनी अभिषेक केले. त्यानंतर हभप भगवान महाराज यांचे अमृततुल्य काल्याचे कीर्तन संपन्न झाले. त्यांनी समाजातील प्रत्येक घटकाने व्यसनापासून दूर राहून जिवनात आदर्श निर्माण करावा आणि



साधू हे वैराग्य मूर्ती असून ते साधुच असतात नागेशपुरी महाराज आणि वैकुंठवासी रामकृष्ण महाराज हे महान संत होते त्यांनी समाज प्रबोधन करून समाजाला एक नवी दिशा देण्याचे महान कार्य केले त्यामुळे येथे भक्तांची झालेली मांदियाळी या वरून सिद्द होते कि वै. रामकृष्ण महाराज तपश्चर्या आणि त्यांची भक्तावर असलेले प्रेम ही त्याची पावती म्हणजे येथे झालेली हजारो भक्तांची उपस्थिती होय असे विचार मांडत महंत रामकृष्ण महाराज हे अध्यात्मिक प्रबोधनाचे चालते बोलते विद्यापीठ होते असे विचार मांडले मंहत भगवान म हाराजांनी काल्याच्या अमृतुल्य किर्तनातुन मांडले.या सप्ताहमध्ये भक्तांनी विविध किर्तनकारांच्या विचारांना आत्मसात केले. या सप्तहात शिवरामपुरी मठ संस्थान वरपगाव येथे अनेकांनी विविध दुकाने लावली होती, त्यामुळे या परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. रामकृष्ण महाराज यांच्या जयघोषाने ही नगरी दुमदुमून गेली होती. त्या नंतर उपस्थित भक्तांनी म हाप्रसादचा लाभ घेतला यावेळी पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. अनेक मान्यवरांची उपस्थिती यावेळी ह.भ.प.प्रकाश साठे महाराज , ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज लांब, ह.भ.प. दिलीप म हाराज खानापूरकर, ह.भ.प. दीपक महाराज मेटे
लव्हरी, ह.भ.प. बोराडे महाराज, ह.भ.प.गणेश महाराज माळेगावकर, ह.भ.प. परमेश्वर महाराज जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, सुनील गलांडे, किसनदादा कदम, भगवान केदार अकलूज चे प्राचार्य डॉ. आबासाहेब देशमुख, डॉ. टी. एल. देशमुख सहपंचक्रोशीतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला यावेळी वरपगाव ग्रामस्थांनी वतीने भक्तगणाचे आभार मानले मुंदडा परिवाराच्या राजकीय प्रवासात शिवरामपुरी मठसंस्थानाची प्रेरणा राहिली आहे. असे नंदकिशोर मुंदडा यांनी आपल्या शब्दात उजळा दिला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com